शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यात विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये नवीन पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास/ सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास/ विद्यमान डी.फार्मसी संस्थेत बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरू करण्यास/प्रवेशक्षमता पूर्ववत करण्यास/ विद्यमान अभ्यासक्रम इतर अभ्यासक्रमात विलीन करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.१९९/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०४ जून, २०१८

**संदर्भ :** संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१८/५७९, दिनांक ११.०५.२०१८ व सहपत्रे.

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबतची यादी दिनांक ०७.०५.२०१८ रोजीच्या ई-मेल द्वारे संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उपलब्ध करुन दिली आहे. उपलब्ध करून दिलेल्या सदर यादीनुसार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ११/०५/२०१८ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान डी. फार्मसी संस्थेत बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे , पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम इतर विद्यमान अभ्यासक्रमात विलीन करणे इत्यादी बाबत शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, संचालक, तंत्र शिक्षण यांनी सादर केलेल्या उपरोक्त संदर्भीय प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र - अ (Annexure “A”), प्रपत्र - ब (Annexure “B”) व प्रपत्र -क

(Annexure “C”) मध्ये नमूद केलेल्या विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान डी. फार्मसी संस्थेत बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे , पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम इतर विद्यमान अभ्यासक्रमात विलीन करणे याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ (Annexture “A”) , प्रपत्र - ब (Annexture “B”) **व** प्रपत्र -क (Annexure “C”) मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान डी. फार्मसी संस्थेत बी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे , पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, विद्यमान अभ्यासक्रम इतर विद्यमान अभ्यासक्रमात विलीन करणे या बाबींस शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील .

२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता वर नमूद केल्याप्रमाणे राहील.

३ शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ,तंत्र शिक्षण ,महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४. सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/ संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५. संबंधित संस्थेने संचालक ,तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६. सदर पदवी , पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची दिनांक १०/१२/२०१४ ची अधिसूचना विचारात घेता, नव्याने मान्यता देण्यात आलेल्या पदविका व पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी फार्मसी ॲक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत. याकरीता " The Bachelor of Pharmacy ( B.Pharm ) Course Regulation, २०१४" मधील Chapter- II मधील क्र.९ येथील तरतुद पुढीलप्रमाणे असनू त्याचे पालन करणे आवश्यक राहील.

> "No.Person, institution, Society, Trust or university shall start and conduct B. Pharm Programme without the prior approval of the Pharmacy council of India."

सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

९. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०.संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या

मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा.प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१२.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०४१२५१३१२२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( समीर ढेरे )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई .
८. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
९. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
१०. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया
११. कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली -११०००२
१२. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
१३. निवड नस्ती/तांशि-४.

Annexure B

Higher and Technical Education Department, Government Resoluation No. TEM-2018/C.R. 199/TE-4, Dated 04.06.2018

List of B.Pharmcay course in existing D.Pharmacy Institute, Approved by AICTE for A.Y. 2018-19

| SR.NO. | DTE CODE | AiCTE CURRENT APPLICATION NO. | NAME OF THE INSTITUTE | INSTITUTE ADDRESS | INSTITUTE DISTRICT | INSTITUTE TYPE | PROGRAMME | AFFILIATING UNIVERSITY / DEPARTMENT | LEVEL OF COURSE | NAME OF THE COURSE | SHIFT | FULL TIME / PART TIME | APPROVED INTAKE 2017-18 | APPROVED INTAKE 2018-19 | VARIATION |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2567 | 1-3507993754 | YASHODEEP INSTITUTE OF PHARMACY | GUT NO.114,PIMPALGAON PANDHARI,SHREE SHETRA KACHNERJI ROAD,BEED ROAD, AURANGABAD | AURANGABAD | Unaided - Private | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 100 | 100 |
| 9 | 2577 | 1-3508829283 | DAYANAND EDUCATION SOCIETY'SDAYANAND INSTITUTE OF PHARMACY. | BARSHI ROAD, LATUR 413 531 | LATUR | Unaided - Private | PHARMACY | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 10 | 4650 | 1-3507976601 | P. R. PATIL INSTITUTE OF PHARMACY | ARVI ROAD, TALEGAON(SP), TQ. ASHTI, DIST. WARDHA. | WARDHA | Unaided - Private | PHARMACY | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 11 | 4651 | 1-3508835076 | CENTRAL INDIA COLLEGE OF PHARMACY D.PHARM | MOUZA LONARA NAGPUR 441123 | NAGPUR | Unaided - Private | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 12 | 5286 | 1-3507989719 | SWAMI VIVEKANAND SANTHA INSTITUTE OF PHARMACY | A/P.MUNGASE,TAL .MALEGAON,DIST. NASHIK, 423203 MAHARASHTRA | NASHIK | Unaided - Private | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 100 | 100 |
| 13 | 5424 | 1-3508398530 | PRATIBHATAI PAWAR COLLEGE OF PHARMACY | SURVEY NO 3&6/2,WADALA MAHADEV,SHRIRAMPUR NEWASA ROAD,TAL-SHRIRAMPUR,DIST-AHMEDNAGAR | AHMEDNAGAR | Unaided - Private | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 100 | 100 |

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या पदविका अभियांत्रिकी तंत्रनिकेतनात नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ / घट तसेच पदविका अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थांना शासन मान्यता देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः मान्यता-२०१६/(१४८/१६)/ताशि-५,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१६.

<u>संदर्भ</u> :- १. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा दि. ०६.०५.२०१६ रोजीचा ई-मेल.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १०/ एनजीपी/ मान्यता/२०१६-१७/४६४, दि. १०.०५.२०१६.

**प्रस्तावना-:**

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या पदविका अभियांत्रिकी तंत्रनिकेतनात नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ/घट तसेच पदविका अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थांना शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -:**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना प्राप्त झालेल्या मान्यतेच्या अनुषंगाने अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनात सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील Annexure A१, Annexure A२, Annexure B१, Annexure B२, Annexure C आणि Annexure D मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ/घट तसेच अभ्यासक्रम बंद करणे याकरीता शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासुन खालील अटी शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता विवरणपत्रातील त्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर पदविका अभ्यासक्रमांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

५) नव्याने मान्यता देण्यात आलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुखांनी फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील. सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

६) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

७) महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ व त्याच्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणारे नियम तथा आदेश संबंधित संस्थांना लागु राहतील.

८) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे शिफारस करण्यात येईल.

९) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयी सुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

१०) सदर संस्था, संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

११) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

१२) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या अटी/शर्ती यांची पुर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहिल.

१४) अभ्यासक्रमात बदल झाल्यामुळे/अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे भविष्यात जी काही परिस्थीती उद्भवते त्यास संबंधित संस्था जबाबदार राहतील. याप्रमाणे तसे हमीपत्र संबंधित संस्थांनी द्यावयाचे आहे.

१५) याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७११२३४४९४१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( अ.र. काटकर )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे (पु.), मुंबई-५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व), (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
४. संबंधित संस्था (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)

**प्रत माहितीसाठी:-**

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली-११०००१.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.

## शासन निर्णय क्र. मान्यता-2016/(148/16)/ताशि-5, दि . 11 जुलै, 2016 सोबतचे विवरणपत्र ANNEXURE A2
## List of New Unaided Private Diploma Institute Approved for A.Y. 2016-17

| Sr. No. | APPLICATION ID | REGIONAL OFFICE | NAME OF THE INSTITUTE | INSTITUTE ADDRESS | INSTITUTE DISTRICT | CITY | INSTITUTE TYPE | NAME OF THE SOCIETY/ TRUST | SOCIETY/ TRUST ADDRESS | PROGRAMME | SHIFT | LEVEL OF COURSE | COURSE | FULL TIME/ PART TIME | AFFILIATING BODY | APPROVED INTAKE 2015-16 | APPROVED INTAKE 2016-17 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1-2858839394 | Western | NOOTAN COLLEGE OF PHARMACY | GAT NO 412 LANDGEWADI TALUKA KAVATHEMAHANKAL, DIST: SANGLI | SANGLI | KAWATHEMAHAKAL | Unaided - Private | RASHTRIYA AAROGYA NYAYA SANSHODHAN SANSTHA ( NATIONAL HEALTH LAW RESEARCH INSTITUTE) | 304, DATTABHUMIK, NANDIVLI RD, NEAR NALA, DOMBIVLI EAST | PHARMACY | 1st Shift | DIPLOMA | PHARMACY | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education | 0 | 60 |
| 2 | 1-2859391891 | Western | YASHODEEP INSTITUTE OF PHARMACY | GUT NO.114,PIMPAL GAON PANDHARI,SHREE SHETRA KACHNERJI ROAD,BEED ROAD,AURANGABAD | AURANGABAD | PIMPALGAON PANDHARI | Unaided - Private | KAI.DAMODHAR YEOLE BAHUUDESHIYYA SEVABHAVI SANSTHA | C-2,NAYANTARA, HIMANSHU PRIDE, APNA NAGAR, DARGA ROAD, AURANGABAD, MAHARASTRA | PHARMACY | 1st Shift | DIPLOMA | PHARMACY | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | 0 | 60 |
| 3 | 1-2853115721 | Western | PROF.RAVINDRA NIKAM COLLEGE OF PHARMACY | MORANE GONDUR BYPASS ROAD, GONDUR TAL-DIST DHULE(MS) | DHULE | DHULE | Unaided - Private | ONKAR BAHUUDDESHIYA VIKAS SANSTHA.DHULE(MS) | 41.SHIVPRATAP COLONY DEOPUR DHULE | PHARMACY | 1st Shift | DIPLOMA | PHARMACY | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | 0 | 60 |
| 4 | 1-2845305801 | Western | SHREEYASH INSTITUTE OF PHARMACY | GUT NO. 258 (P), SATARA PARISAR, BEED BY PASS, NEAR SRPF CAMP, AURANGABAD | AURANGABAD | AURANGABAD | Unaided - Private | SHREEYASH PRATISHTHAN | GUT NO. 258 (P), SATARA TANDA, SATARA PARISAR, BEED BY PASS, AURANGABAD. | PHARMACY | 1st Shift | DIPLOMA | PHARMACY | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | 0 | 60 |